| | |
|---|---|
| प्राप्त दिनांक | २२/१०/२०१९ |
| नोंदणी दिनांक | २२/१०/२०१९ |
| निकाल दिनांक | २७/०३/२०२६. |
| कालावधी | ०६ व. ०५ म. ०५ दि. |

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,समूद्रपूर यांचे न्यायालयात**
**(पिठासिन अधिकारी – पी. एल. पाटील)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ६१४/२०१९.** **निशाणी क्र. ३८ पुढे**
(**CNR No**. **MHWR**–050009612019)

महाराष्ट्र शासन
मार्फत ठाणे अंमलदार ,
समूद्रपूर पोलीस ठाणे. ..... **अभियोगपक्ष.**

**विरुध्द**

१. शेख अयाज शेख रियाज,
वय – ३२ वर्षे, व्यवसाय – मजुरी,
रा. वार्ड नं.१० वर्धा ता.,जि. वर्धा

२. दिनेश अशोकराव येंडाले,
वय – ३२ वर्षे, व्यवसाय – मजुरी,
रा. वार्ड नं.०६ वर्धा ता.,जि. वर्धा ..... **आरोपी**.

---

अभियोगपक्षातर्फे – श्री. ए.ए. चवरे सहा. सरकारी अभियोक्ता.
आरोपींतर्फे विधीज्ञ – श्री. एस.झेड. जामुनकर.

---

**न्या य नि र्ण य**

(पारित दिनांक २७.०३.२०२६ रोजी )

आरोपींविरुध्द सदरचा खटला भारतीय दंड विधान, १८६० चे कलम २७९, महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ चे कलम ६५ अ, ई आणि मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम १४६/१९६ अन्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्हयासाठी चालविण्यात आला.

२. अभियोगपक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे –

दिनांक १४.१०.२०१८ रोजी तक्रारकर्ता यांना मिळालेल्या बातमीवरुन त्यांनी पंच व पोलीस स्टाफसह कोल्ही शिवार, हनुमान मंदिराजवळ नाकेबंदी केली. त्यावेळी आरोपी क्रमांक ०१ याने नाकेबंदी पाहून त्याच्या ताब्यातील इनिव्हा कार एम.एच.३१ सी.एन. ३१०३ हि वळवून चुकीच्या बाजुने रोडवर उभा असलेल्या ट्रक क्रमांक एन.एल. ०१–९९१६ ला जावून धडक मारली. त्यानंतर आरोपी हा पळू लागला असता त्यास पाठलाग करुन पकडले. सदर इनिव्हा कारमध्ये देशी दारुने भरलेल्या ९० मि.ली.च्या ६० खोक्यामध्ये सहा हजार सिलबंद शिश्या तसेच टयुबर्ग कंपनीच्या ५०० मि.ली. चे १२० कॅन असा मुद्देमाल मिळून आल्याने जप्ती पंचनामा प्रमाणे कार्यवाही केली. आरोपीने भरधाव वेगाने त्याच्या ताब्यातील इनिव्हा कार चालवून ट्रकला धडक मारुन नुकसान केले तसेच इनिव्हा कारमध्ये देशी व विदेशी दारु मिळून आली म्हणून तक्रारकर्त्याने

पोलीस स्टेशन समुद्रपूरला  रिपोर्ट दिला.

३.	तक्रारकर्त्याने दिलेल्या रिपोर्टवरुन पोलीस ठाणे अंमलदार, समुद्रपूर पोलीस स्टेशन यांनी आरोपींविरुध्द गु.र.क्र. ५५०/२०१८ हा भारतीय दंड विधान १८६० चे कलम २७९, महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ चे कलम ६५ अ, ई आणि मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम १४६/१९६ अन्वये गुन्हा नोंदवला. तपासी अंमलदार श्री. अरविंद येनुरकर यांनी तपासाअंती आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

४.	पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपीविरुध्द निशाणी क्र. ३८ ला भारतीय दंड विधान १८६० चे कलम २७९, महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ चे कलम ६५ अ, ई, आणि मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम १४६/१९६ अन्वये गुन्हा दोषारोप निश्चित केला. आरोपींनी गुन्हा नाकबुल करुन खटल्यास सामोरे जाण्याचे ठरवले. आरोपींचा फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ अन्वये जबाब निशाणी क्र. ४२ वर नोंदविण्यात आला.

५.	आरोपींविरुध्द आरोप सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षातर्फे एकुण ०३ साक्षीदार तपासण्यात आले आहेत.  अभियोगपक्षाने, घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्र. ४१), फोटोग्राफारला दिलेले सुचनापत्र (निशाणी क्र. ४२), सी.ए.फॉर्म (निशाणी क्र. ४३), आरोपींचा अटक फॉर्म (निशाणी क्र. ४४), फिर्याद (निशाणी

क्र. ४५) आणि प्रथम खबर अहवाल (निशाणी क्र. ४६) इत्यादी कागदोपत्री पुराव्यावर भिस्त ठेवली आहे.

६. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील उपलब्ध असलेला कागदोपत्री पुरावा व साक्षीपुरावा विचारात घेता खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यावर कारणांसह पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवीत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अभियोगपक्ष सिध्द करतो काय की, दिनांक १४.१०.२०१८ रोजी १४.४५ वाजण्याच्या सुमारास मौजे गव्हा कोल्ही, ता.समुद्रपूर, जि.वर्धा येथील सार्वजनिक रस्त्यावर आरोपींनी त्याचे ताब्यातील इनिव्हा चार चाकी गाडी क्र. एम.एच. ३१ सी.एम. ३१०३ हे वाहन हयगयीने व निष्काळजीपणे चालवून अपघात केला म्हणून त्यांनी भा.दं.वि. २७९ अन्वये शिक्षापात्र अपराध केला? | --- नाही. |
| २) | अभियोगपक्ष सिध्द करतो काय की, वर नमूद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी त्यांच्या ताब्यातील वर नमूद इनिव्हा कारमध्ये विनापरवाना बेकायदेशीररित्या देशी दारुने भरलेल्या ९० मि.ली.च्या ६० खोक्यामध्ये सहा हजार सिलबंद शिश्या तसेच टयुबर्ग कंपनीच्या ५०० मि.ली. चे १२० कॅनची चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने ताब्यात बाळगून होते, म्हणून त्यांनी महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (अ), (ई) प्रमाणे गुन्हा केला? | --- नाही. |
| ३) | अभियोगपक्ष सिध्द करतो काय की, वर नमूद तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपींनी त्यांचे ताब्यातील वर नमूद वाहन विना | |

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| | विम्याचे चालविताना मिळुन आले, म्हणून त्यांनी मोटार वाहन कायदा कलम १४६/१९६ प्रमाणे गुन्हा केला? | --- नाही. |
| ४) | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे . |

## कारणमीमांसा

७. आरोपीविरुध्द आरोप सिध्द करण्याकरीता अभियोगपक्षातर्फे तक्रारकर्ता प्रेमराज अवचट (अ.सा.क्र.३), घटनास्थळ पंच नितीन ढगे (अ.सा.क्र.१) आणि अमोल डुकरे (अ.सा.क्र.२) यांना तपासण्यात आले आहे.

८. **मुद्दे क्र. १ ते ३ बाबत –**

प्रस्तुत मुद्दे क्र. १ ते ३ हे एकमेकांशी संलग्न असल्याकारणाने तसेच पुराव्याची पुनरावृत्ती होवू नये याकरीता सदर मुद्याचे एकत्रीतरित्या विवेचन करण्यात येत आहे. अभियोगपक्षाचे कथन की, आरोपी शेख अयाज याने त्याच्या ताब्यातील इनिव्हा कार क्रमांक एम.एच.३१–सी.एन ३१०३ हि रॉन्ग साईडने चालवून उभ्या असलेल्या ट्रकला धडक दिली. आरोपी हा पळू लागला असता पाठलाग करुन पकडले. अभियोगपक्षातर्फे तक्रारकर्ता प्रेमराज अवचट यास साक्षीदार क्र. ०३ म्हणून तपासण्यात आले आहे. आरोपींच्या विधीज्ञांचे कथन की, सदर साक्षीदाराने पोलीस हवालदार शेखर डोंगरे याने पाठलाग करुन आरोपीस तथाकथित

पकडल्याबाबत कथन केले आहे. आरोपीच्या विधीज्ञांचे कथन की, सदर साक्षीदार क्र. ०३ याने आरोपीस पकडलेले नाही. त्यांचे कथन की, प्रस्तुतकामी पोलीस हवालदार नामे श्री शेखर डोंगरे यांना साक्षीदार म्हणून तपासण्यात आलेले नाही. साक्षीदार क्र. ०३ हा पोलीस साक्षीदार आहे. त्यामुळे, केवळ पोलीस साक्षीदाराच्या साक्षीवर विसंबून राहून आरोपींने त्यांच्या ताब्यातील गाडी भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालविली असे गृहीत धरणे योग्य होणार नाही.

९.      अभियोगपक्षाचे कथन की, सदर आरोपीच्या ताब्यातील इनिव्हा गाडीमध्ये देशी दारुने भरलेल्या ९० मि.ली.च्या ६० खोक्यामध्ये सहा हजार सिलबंद शिश्या तसेच टयुबर्ग कंपनीच्या ५०० मि.ली. चे १२० कॅन असा मुद्देमाल मिळून आला. सदर कथनापुष्टयर्थ अभियोगपक्षाने घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच साक्षीदार यांना तपासण्यात आले असून ते अभियोगपक्षाच्या कथनास पुष्टी देत नाहीत. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारांना सुचक प्रश्न विचारले असता अभियोगपक्षास मदत होईल अशी कोणतीही बाब अभिलेखावर आलेली नाही. त्यामुळे आरोपीच्या विधीज्ञांचे कथन की, मौका जप्ती पंचनामा व त्यातील मजकूर शाबीत झालेला नाही.

१०.      सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे कथन की, साक्षीदार क्र. ०३ याने त्याच्या साक्षीपुराव्यामध्ये आरोपीच्या ताब्यातील गाडीमधून मुद्देमाल जप्त केल्याबाबत कथन केले आहे. आरोपीच्या विधीज्ञांचे कथन की, साक्षीदार क्र. ०३

याने घटनास्थळ पंचनाम्याबाबत त्यांच्या साक्षीपुराव्यात मोघम असे कथन केले आहे. त्यांचे पुढे कथन की, साक्षीदार क्र. ०३ याने घटनास्थळा बाबत निश्चित असे कथन केलेले नाही. त्यांचे पुढे कथन की, सदर पोलीस साक्षीदाराच्या साक्षीपुराव्यास कोणताही स्वतंत्र साक्षीदार पुष्टी देत नाही. आरोपीच्या विधीज्ञांचे कथन की, सदर इनिव्हा गाडी आरोपींच्या मालकीची होती हे दर्शविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा तपासी अंमलदार यांनी अभिलेखावर दाखल केलेला नाही किंवा त्यापुष्टयर्थ कोणताही साक्षीदार तपासण्यात आलेला नाही.

११. आरोपीच्या विधीज्ञांचे कथन की, प्रस्तुत प्रकरणी कथाकथित मौका जप्ती पंचनाम्यावरील पंच साक्षीदार व फोटोग्राफर वगळता तपासी अमंलदार यांनी कोणताही स्वतंत्र साक्षीदार तपासलेला नाही. आरोपीच्या विधीज्ञांचे कथन की, कथाकथित घटनेच्या तारखेपासून मुद्देमाल सी.ए. कार्यालयामध्ये जमा करेपर्यंत मुद्देमाल कोणत्या अवस्थेमध्ये होता याबाबत अभिलेखावर कोणताही पुरावा आलेला नाही. सदर मुद्देमाल सी.ए. कार्यालयात जमा केल्यापासून मुद्देमालाची तपासणी होई पर्यंत १३ दिवसापेक्षा जास्तीचा कालावधी का लागला तसेच सदर कालावधीमध्ये मुद्देमाल कोणत्या परिस्थितीमध्ये होता याबाबत अभिलेखावर काही आलेले नाही. त्यामुळे आरोपींच्या विधीज्ञांचे कथन की, केवळ साक्षीदार क्र. ३ या पोलीस साक्षीदाराच्या कथनावर विसंबून राहून आरोपींनी त्यांच्या ताब्यातील इनिव्हा गाडी क्रमांक एम.एच.३१–सी.एन.३१०३ हि गाडी बेदरकारपणे विरुध्द दिशेने चालवून उभ्या असलेल्या ट्रकला धडक दिल्याचे तसेच सदर इनिव्हा

गाडीमध्ये देशी दारुने भरलेल्या ९० मि.ली.च्या ६० खोक्यामध्ये सहा हजार सिलबंद शिश्या तसेच टयुबर्ग कंपनीच्या ५०० मि.ली. चे १२० कॅन असा मुद्देमाल मिळून आल्याचे गृहीत धरणे योग्य होणार नाही.

१२. अशापरिस्थितीमध्ये, आरोपीने त्याचे ताब्यातील तथाकथित इनिव्हा चाकी गाडी क्र.एम.एच.३१–सी.एन.३१०३ हे वाहन वाहतुकीचे नियमांचे पालन न करता तसेच हयगयीने, वेगाने निष्काळजीपणे व धोकादायकरित्या वेगाने चालवुन ट्रकला धडक दिल्याचे व सदर आरोपींच्या ताब्यातुन देशी दारुने भरलेल्या ९० मि.ली.च्या ६० खोक्यामध्ये सहा हजार सिलबंद शिश्या तसेच टयुबर्ग कंपनीच्या ५०० मि.ली. चे १२० कॅन असा मुद्देमाल मिळून आल्याचे निःसंशयपणे सिध्द झालेले नाही. आरोपीविरुध्द भा.दं.वि. १८६० चे कलम २७९, महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ चे कलम ६५ (अ), (ई) आणि मोटार वाहन कायदा, १९८८ चे कलम १४६/१९६ चे मुख्य घटक सिध्द झालेले नाहीत, म्हणून मुद्दा क्र. १ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवीत आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ बाबत</u> –**

१३. मुद्दे क्र. १ ते ३ चे नकारार्थी निष्कर्ष विचारात घेता संशयाचा फायदा आरोपींना देऊन त्यांना निर्दोष मुक्त करणे योग्य होणार आहे, म्हणुन मुद्दा क्र. ०४ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१) १. शेख अयाज शेख रियाज, वय – ३२ वर्षे, व्यवसाय – मजुरी, रा. वार्ड नं.१० वर्धा ता.,जि. वर्धा, २. दिनेश अशोकराव येंडाले, वय – ३२ वर्षे, व्यवसाय – मजुरी, रा. वार्ड नं. ०६ वर्धा ता.,जि. वर्धा यांची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५(१) नुसार भारतीय दंड विधान १८६० चे कलम २७९, महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ चे कलम ६५ (अ), (ई) आणि मोटार वाहन कायदा, १९८८ चे कलम १४६/१९६ अन्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्हयातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र व जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते.

३) प्रस्तुत गुन्हाकमी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल हा मुल्यहीन असल्याने त्याची अपील कालावधी संपल्यानंतर कायदेशीररीत्या योग्य ती विल्हेवाट लावण्यात यावी.

४) प्रस्तुत गुन्हयाकामी जप्त करण्यात आलेली चार चाकी गाडी क्रमांक एम.एच.३१ सी.एन. ३१०३ हि यापुर्वी कोणाला दिली गेली नसल्यास सदर चार चाकी गाडी त्याच्या मुळ मालकास कायदेशीर रीत्या देण्यात यावी.

५) आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ प्रमाणे रक्कम रु. ५०,०००/–चा जामीन या न्यायालयात भरुन द्यावा. सदरचा जामीन पुढील सहा महिन्यापर्यंत बंधनकारक राहील.

प्रस्तुत न्यायनिर्णय हा खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.

PATIL PRAKASH LALASAHEB
Digitally signed by PATIL PRAKASH LALASAHEB
Date: 2026.03.30 17:43:49 +0530

समूद्रपूर.		( पी. एल.पाटील)
दिनांक – २७.०३.२०२६		न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, समुद्रपूर.

**CERTIFICATE**

Certified that PDF copy of judgment is word to word identification to the original order.

(A. A. More)
Stenographer Gr–III